मराठी माणसाचा मानदंड

राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २७४ ✻ सातारा ✻ सातारा ✻ सोमवार दि. १७ जून २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

समाजवादी पार्टी आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये ३५ जागा लढविणार

२ जुलै रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये प्रीपेड मीटर्सविरोधी आंदोलन

मुंबई : आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये समाजवादी पार्टीच्या वतीने महाराष्ट्रामध्ये पक्षाचे जेथे उत्तम काम, उत्तम जनाधार, संघटन व प्रभावक्षेत्र आहे अशा किमान ३५ जागा लढवण्यात येतील, असा निर्णय समाजवादी पार्टीच्या मुंबई येथे झालेल्या राज्य कार्यकारीणीच्या बैठकीमध्ये एकमताने घेण्यात आलेला आहे.

त्याचबरोबर महावितरण कंपनी आणि राज्य सरकार राज्यातील सर्वसामान्य ग्राहकांवर प्रीपेड मीटरच्या मार्गाने ग्राहकांची विनाकारण आर्थिक लूट करणारा आणि खाजगीकरणाला प्रोत्साहन देणारा निर्णय घेत आहे. त्या निर्णयाच्या व प्रीपेड मीटर्सच्या विरोधात मंगळवार दि. २ जुलै रोजी संपूर्ण राज्यभर समाजवादी पार्टीच्या वतीने सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी आणि त्याचबरोबर कांही तालुक्याच्या ठिकाणी आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. अशी माहिती समाजवादी पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष प्रताप होगाडे यांनी जाहीर प्रसिद्धीपत्रकाद्वारे प्रसिद्धीस दिलेली आहे.

समाजवादी पार्टीचे सर्व राज्य पदाधिकारी, राज्य कार्यकारीणी सदस्य, जिल्हाध्यक्ष व पक्षाच्या विविध आघाड्यांचे प्रमुख यांचे संयुक्त बैठक मुंबई येथील बॅलार्ड इस्टेट येथील समाजवादी पार्टी मुख्य कार्यालयामध्ये संपन्न झाली.

या बैठकीमध्ये समाजवादी पक्षाने नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकामध्ये उत्तर प्रदेश मध्ये लोकसभेच्या ३७ जागा जिंकून जे यश मिळवले आणि देशामधील पक्ष लोकसभेमध्ये तिसऱ्या क्रमांकावर पोहोचवला, त्याबद्दल पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. अखिलेश यादव आणि उत्तर प्रदेश समाजवादी पार्टी यांचे अभिनंदन करण्यात आले. त्याचबरोबर महाराष्ट्रामध्ये समाजवादी पार्टीने एकही जागा न लढविता 'संविधान बचाव, तानाशाही हटाव' भूमिकेतून राज्यात सर्वत्र महाविकास आघाडीस मदत केली, प्रभाव असलेल्या ठिकाणी प्रचंड संख्येने मतदान घडवून आणले आणि महाविकास आघाडीच्या यशामध्ये वाटा उचलला, याबद्दल राज्यातील सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन करण्यात आले. आगामी विधानसभा निवडणुका राज्यामध्ये निश्चितपणाने सत्तापालट घडवणाऱ्या ठरतील, असा विश्वास राज्य कार्यकारिणीने एक मताने व्यक्त केला आहे. त्याचबरोबर समाजवादी पार्टीचे प्रभावक्षेत्र असलेले विधानसभा मतदारसंघांबाबत तपशीलवार चर्चा झाली आणि अशा ३५ विधानसभा मतदारसंघांमध्ये समाजवादी पार्टीच्या वतीने विधानसभेच्या निवडणुका लढविण्यात याव्यात, असा निर्णय झाला आहे. प्रदेशाध्यक्ष आमदार मा. अबु आसिम आझमी यासंदर्भात पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. अखिलेशजी यादव यांच्याशी चर्चा करणार असून त्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल.

महावितरण कंपनी आणि राज्य सरकार महाराष्ट्रातील सर्व सव्वा दोन कोटी वीज ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटर्स लावणार अशी योजना निश्चित करण्यात आलेली आहे. वास्तविक दरमहा ३०० युनिट्सपेक्षा कमी वीजवापर करणाऱ्या सर्वसामान्य २ कोटी ५ लाखांहून अधिक ग्राहकांना या प्रीपेड मीटरची गरजच नाही.

तरीही या योजनेमुळे या सर्वसामान्य वीज ग्राहकांवर किमान २५ हजार कोटी रुपयांच्या कर्जाचा बोजा लादण्यात येणार आहे व या रकमेची परतफेड ग्राहकांना किमान ३० पैसे प्रति युनिट दरवाढीच्या रूपाने करावी लागणार आहे. सध्याचे २६०० व ४००० रु. दराचे मीटर स्मार्ट, पुरेसे व सुस्थितीत असतानाही हे १२,००० रु. दराचे स्मार्ट मीटर्स केवळ खाजगीकरणास मदत करण्यासाठी आणि राज्यात येणाऱ्या खाजगी वितरण परवानाधारकांच्या सोयीसाठी लावण्यात येत आहेत असा आरोप समाजवादी पार्टीच्या वतीने करण्यात आलेला आहे. ग्राहकांच्या वरील अनावश्यक भुर्दंड रद्द झाला पाहिजे आणि त्याचबरोबर दुप्पट दराने मंजूर करण्यात आलेल्या टेंडर्सची चौकशी व कठोर कारवाई करण्यात आली पाहिजे अशीही मागणी या बैठकीमध्ये करण्यात आलेली आहे.

त्याचबरोबर तातडीने येत्या आठ दिवसांत राज्यात प्रत्येक जिल्ह्यामध्ये पत्रकार परिषदा घेण्यात येतील. पार्टीच्या वतीने व विविध स्थानिक संघटनांच्या वतीने राज्य सरकारला इशारा निवेदन देण्यात येईल. राज्य विधानसभेला जागे करण्यासाठी संपूर्ण राज्यात सर्व जिल्ह्यांमध्ये आणि शक्य त्या तालुक्यांच्या ठीकाणी मोर्चा, धरणे, निदर्शने इत्यादी विविध मार्गाने प्रीपेड मीटर विरोधी आंदोलन मंगळवार दिनांक २ जुलै रोजी एकाच दिवशी करण्यात येईल, असाही निर्णय घेण्यात आलेला आहे. अशीही माहिती या प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आलेली आहे.

मुंबई येथे झालेल्या या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रताप होगाडे होते. या बैठकीमध्ये पक्षाचे उपाध्यक्ष डॉ. पी. डी. जोशी पाटोदेकर, प्रधान महासचिव परवेझ सिद्दिकी, महासचिव डॉ. अब्दुल राऊफ, डॉ. विलास सुरकर, राहुल गायकवाड, श्रीमती साजिदा निहाल अहमद, कल्पना गंगवार, अनिस अहमद इत्यादी प्रमुखांनी मार्गदर्शन केले. या बैठकीस रमेश शर्मा, दीपक चिमणकर, लियाकत खान, याकूब पठाण, फैसल खान, हैदर पटेल, जावेद खान, इब्राहिम खालिक, फारुक पाशा, नबी सिपोराकर, शाहूराज खोसे, नामदेव तिकटे, एडवोकेट शिवाजी कांबळे, अफजल पठाण, रईस बागवान, गुड्डूभाई काकर, मुस्तकीन डिग्रिटी, शानेहिंद निहाल अहमद, इमरान चौधरी, साधना शिंदे, बी डी यादव, सहदेव वाळके, दिलावर खान, विष्णू गोडबोले, बब्बू खान, अबू डोंगरे, मुकुंद माळी, जितेंद्र सतपाळकर, प्रकाश लवेकर, कुमार राऊत इत्यादी राज्यातील विविध जिल्ह्यांतील प्रमुखांनी आपले मनोगत व्यक्त केले.

नीट प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांकडून चौकशी

नवी दिल्ली : नीट परीक्षेबाबतच्या वादानंतर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी याबाबतचा आपला सूर बदलला आहे. यातील दोषींना सोडणार नाहीत, असे स्पष्ट करतानाच त्यांनी नॅशनल टेस्टिंग एजन्सीमध्ये सुधारणा करण्याची गरज असल्याचे म्हटले आहे. विद्यार्थ्यांना त्यांनी आश्वासन दिले की, जो कोणी या प्रकरणात दोषी आढळेल त्याच्याविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल.

ओडिशामधील आपल्या मतदारसंघात प्रधान म्हणाले की, काही विद्यार्थ्यांना कमी वेळेमुळे ग्रेस मार्क दिले गेल्याचे आढळले आहे तर दुसरीकडे दोन ठिकाणी गैरप्रकार झाल्याचे समोर आले आहे. सरकारने हे प्रकरण गंभीरतेने घेतले असून, विद्यार्थी आणि पालकांनी निश्चिंत राहावे. आम्ही कडक कारवाई करणार आहोत. नॅशनल टेस्टिंग एजन्सीमधील अधिकारीही या प्रकरणात दोषी असल्यास त्यांच्यांवर कठोर कारवाई केली जाईल. कोणत्याही दोषींनी सोडले जाणार नाही.न्यायालय नियुक्त अधिकाऱ्यांकडून चौकशी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या नीट परीक्षेबाबत वाद सुरू असताना या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांकडून चौकशी करा अशी मागणी माजी मनुष्यबळ विकासमंत्री कपिल सिब्बल यांनी रविवारी केली. तसेच, सरकारने परीक्षा आयोजित करण्याच्या पद्धतींबाबत सर्व राज्यांशी सखोल चर्चा करावी, असे मतही त्यांनी व्यक्त केले.अधिवेशनात जोरदारपणेमुद्दा मांडावा: सिब्बलआगामी संसदेच्या अधिवेशनात सर्व राजकीय पक्षांनी हा मुद्दा जोरदारपणे मांडावा. हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे कारण देत सरकार चर्चेला परवानगी देणार नाही. त्यामुळे त्यावर चर्चा होण्याची फारशी आशा नाही. गुजरातमधील काही घटनांनी मला धक्का बसला आहे, असे सिब्बल म्हणाले. गुणवत्तेचे मोजमाप म्हणून सादर केली जाणारी नीट परीक्षा एक घोटाळा आहे.केंद्र सरकारनेया परीक्षेची बाजू घेऊ नये. कारण ते विद्यार्थ्यांच्या हिताविरोधात, सामाजिक न्याय आणि गरिबांच्या विरोधात आहे.

मुख्यमंत्री, तामिळनाडू नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) ची सत्यनिष्ठा आणि नीट परीक्षा आयोजित करण्याच्या पद्धतीवर गंभीर प्रश्न आहे. नीटमध्ये भेदभाव होतो आहे का? गरीब विद्यार्थ्यांना संधीपासून वंचित ठेवले जात आहे का? महाराष्ट्रासारख्या इतर राज्यांनीही नीटबाबत शंका व्यक्त केली आहे.

निवृत्तीचे वय ६० करण्यास राज्य सरकार सकारात्मक

मुंबई : केंद्र सरकार व २५ राज्यांप्रमाणे सरकारी कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करावे, अशी मागणी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे. या मागणीसंदर्भात राजपत्रित अधिकारी महासंघाची नुकतीच सरकारसोबत बैठक झाली असून, या बैठकीत निवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याची माहिती महासंघाकडून देण्यात आली.

मुख्यमंत्री शिंदे यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे शुक्रवारी अधिकारी महासंघ व प्रशासनासोबत संयुक्त बैठक घेतली. त्याचप्रमाणे १० जून रोजी मुख्य सचिवांनीही बैठक घेतली. या दोन्ही बैठकांत अनुभवी अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रशासनाला अधिक उपयोग व्हावा, याच उद्देशाने सरकारने सेवानिवृत्तीचे वय ५८ वरून ६० करण्याबाबत चर्चा झाली. यावेळी दोघांकडून सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले. त्याचप्रमाणे केंद्र सरकारने त्यांच्या कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ४६ वरून ५० टक्के केला आहे.

याबाबतचा प्रस्ताव राज्याच्या वित्त विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी तयार केला आहे, तो शासनाने तत्परतेने मंजूर करावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच, महासंघाच्या कल्याण केंद्र उभारणीचे काम गतीने सुरू आहे, ती गती कमी होऊ नये, यासाठी अधिक निधी देण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले. यावेळी सुधारित पेन्शन योजनेसंदर्भात अधिसूचना काढावी तसेच सरकारी नोकऱ्यांची ३ लाख रिक्त पदे भरावीत, अशी मागणीही महासंघाकडून करण्यात आल्याची माहिती, महासंघाचे ग. दि. कुलथे यांनी दिली.

अतिरिक्त सचिवपदे निर्माण करा

मंत्रालयीन सहसचिव पदासाठीची कमतरता घालविण्यासाठी अन्य राज्यांप्रमाणे अतिरिक्त सचिव पदे तयार करा, अशा सूचना यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सचिवांना दिल्या.

अण्णासाहेब पाटील महामंडळातील ६१ कर्मचाऱ्यांना कामावरून काढले



नवी मुंबई : अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळातील ६१ कर्मचाऱ्यांना तडकाफडकी कामावरून कमी करण्यात आले आहे. महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी हा निर्णय घेतला असून, महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या आंदोलनानंतर शासनाने सगेसोयरे व इतर मागण्यांसाठी मुदत मागून घेतली आहे. राज्यभर मराठा आरक्षणाची चर्चा सुरू झालेली असतानाच अचानक अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळातील ६१ कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्यात आले आहे. या निर्णयामुळे एकच खळबळ उडाली आहे. एकीकडे सरकार मराठा समाजाला न्याय देण्याचे अश्वासन देत आहे, तर दुसरीकडे महामंडळातील मनुष्यबळ कमी केले जात आहे. महामंडळाच्या माध्यमातून आतापर्यंत ९० हजार तरुणांना व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करून दिले आहे. आता कर्मचारी कपातीमुळे कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे, असे समाजबांधवांचे म्हणणे आहे.

नरेंद्र पाटील यांनीही महाव्यवस्थापकांच्या निर्णयास तीव्र विरोध केला आहे. कोणतीही पूर्वकल्पना न देता अचानक हा निर्णय घेण्यात आला. मराठा समाजाचे नुकसान करण्याचे षड्यंत्र कोणाचे हे तपासले पाहिजे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली असून, सोमवारी नवी मुंबईत दुपारी १२ वाजता पत्रकार परिषद घेऊन याबाबत भूमिका स्पष्ट करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

काय होणार परिणाम?

- राज्यातील जवळपास ९० हजार तरुणांना महामंडळाच्या योजनेतून विविध बँकांनी कर्ज दिले आहे. कर्जावरील व्याज परतावा देण्याचे काम आता रखडणार आहे.
- हजारो लाभार्थ्यांना ५० कोटी रूपये व्याज परतावा देणे आचारसंहितेमुळे रखडले आहे. त्या कामास अजून विलंब होईल.
- राज्यातील ज्या बँकांकडून वेळेत कर्ज उपलब्ध करून दिले जात नाही. काही अडचणी असतील, त्या बँकेशी समन्वय ठेवून कर्मचारी त्या सोडवतात. ही समन्वयाची कामेही रखडण्याची चिन्हे आहेत.

काँग्रेसला इतक्या जागा कशा मिळाल्या?

चौकशी व्हावी, राहुल गांधींवर रामदास आठवलेंचा पलटवार

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर आता एतच् हँकिंगचा मुद्दा समोर आला आहे. यावरुनराहुल गांधीकेंद्र सरकारवर टीका करत आहेत. दरम्यान, आता केंद्री मंत्रीरामदास आठवलेयांनी राहुल यांच्या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले की, 'सलग तिसऱ्यांदा सत्तेबाहेर असल्यानेराहुल गांधीएतच् हॅकिंगचा मुद्दा उपस्थइत करत आहेत. ईव्हीएम भाजपने नाही, काँग्रेस सरकारने आणले होते. ईव्हीएम हॅक झाल्याचा मुद्दा विरोधक वारंवार उपस्थित करत असतील, तर सर्व विरोधी पक्षांनी एकमताने ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरनेच निवडणुका घ्याव्यात, असे म्हटले पाहिजे. निवडणूक आयोगानेही वारंवार ईव्हीएम हॅक करून दाखवा, असे आव्हान दिले होते, पण कुणीच पुढे आले नाही, अशी टीका आठवले यांनी केली.

इंडिया आघाडीने २३४ जागा कशा जिंकल्या?

ते पुढे म्हणतात, लोकशाहीत ईव्हीएमवर वारंवार प्रश्न उपस्थित करणे योग्य नाही. रवींद्र वायकर यांच्या विजयात राहुल गांधी ईव्हीएम बिघाडाचा ठपका ठेवत असतील, तरइंडिया आघाडीआणि काँग्रेसला इतक्या जागा कशा मिळाल्या, याचाही तपास व्हायला हवा. २००४ आणि २००९ मध्ये काँग्रेसचे यूपीए सरकार अल्पमतात होते. काँग्रेसकडे बहुमत नव्हते, तरीही सरकार १० वर्षे चालू राहिले. त्यावेळी एनडीए किंवा भाजपने प्रश्न उपस्थित केला होता का? ईव्हीएम हॅक झाल्याचा आरोप केला होता का? यावेळी काही चुका झाल्या, त्यामुळे भाजपला पूर्ण बहुमत मिळाले नाही, मात्र २०१४-१९ मध्ये भाजपला बहुमत मिळाल्यानंतरही एनडीएचे सरकार होते. यावेळीही एनडीएचे सरकार आहे. आम्ही आमच्या चुका सुधारू आणि २०२९ मध्ये मोदीजी पुन्हा पंतप्रधान होतील, असा दावाही त्यांनी यावेळी केला.संजय राऊत यांवर टीका

लोकसभा अध्यक्ष हे महत्त्वाचे पद आहे. चंद्राबाबू नायडू हे प्रामाणिक आणि चांगले नेते आहेत. ते एनडीएसोबतच राहतील. चंद्राबाबूंकडे सभापतीपदासाठी चांगला उमेदवार असेल किंवा भाजपकडे असेल, तर एनडीएमध्ये चर्चा होईल. आम्हाला इंडिया आघाडीची गरज नाही. त्यांनी स्वतःची काळजी करावी. संजय राऊत, तुम्ही स्वतःची काळजी करा. हे सर्वजण चंद्राबाबू नायडूंना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण असे काहीही होणार नाही. संसदेचे अधिवेशन सुरू होऊ द्या, तुम्हाला कळेल. संजय राऊत किंवा इंडिया आघाडीकडे लोकसभा अध्यक्षपदाचा उमेदवार असेल, तर त्यांनी उभा करावा, असे आव्हान त्यांनी यावेळई दिले.आगामी विधानसभेबाबत काय म्हणाले?

आगामी विधानसभा निवडणूक महायुतीपूर्ण ताकदीने लढवेल आणि जिंकेल. लोकसभा निवडणुकीत राज्यात कुठे चुका झाल्या? आम्हाला कमी मते का मिळाली? या सर्वांचा आढावा घेतला जात आहे, त्यामुळे दुप्पट ताकदीने निवडणूक लढवू. लोकसभेसारखा निकाल विधानसभेत येणार नाही. मी दिल्लीत देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती, त्यावेळी मी आमच्या पक्ष आरपीआयला राज्यातील आगामी मंत्रिमंडळ विस्तारासाठी एक मंत्रीपद आणि विधानसभा निवडणुकीत ८-१० जागांची मागणी केली होती. काही जागा कमी-अधिक होऊ शकतात. लोकसभा निवडणूक निकाल आणि एमएलसी निवडणुकीनंतर यावर चर्चा केली जाईल, असे फडणवीस म्हणाले होते. त्यामुळे विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीचीही तयारी पूर्ण झाली आहे, अशी माहितीदेखील आठवले यांनी यावेळी दिली.

संपादकीय

उत्तर,पश्चिमेत परिवर्तनाचे वारे?

गेल्या दोन निवडणुकीत यश मिळवून देणार्या उत्तर प्रदेश, हरयाना, राजस्तान आणि महाराष्ट्र या राज्यांमध्ये भाजपच्या ६७ जागा कमी होणे हा निवडणुकांना कलाटणी देणारा मुद्दा ठरला. या भागात नेमके काय घडले याचा अभ्यास करताना पुढे आलेले मुद्दे देशाच्या राजकारणाची नवी दिशाही स्पष्ट करतात.

लोकसभा निवडणुकीच्या निकालांचे कवित्व अद्याप सुरु असून या निकालांच्या माध्यमातून यापुढील राजकारणाला पूरक ठरणार्या अनेक मुद्दयांचा माग काढला जात आहे. तपशिलात जाऊन पाहिले असता महाराष्ट्र, हरयाना, राजस्तान, उत्तर प्रदेश आणि पंजाब या राज्यातील निवडणूक निकालांमध्ये एक साम्य आढळते. या राज्यांमधील शेतकर्यांनी शेतीमाल, दुधाचे दर, किमान आधार किंमत आदींबाबत आंदोलने केली. सत्ताधार्यानी ती मोडीत काढली. सर्व शेतकर्यांचे दु:ख समान होते.. मात्र आंदोलनात सहभागी होणार्यांना देशद्रोही ठरवणे, गृह खात्याच्या राज्यमंत्र्याच्या मुलाने शेतकर्यांना मोटारीखाली चिरडणे , शेतकर्यांच्या आंदोलनमार्गात खिळे ठोकणे, त्यांच्यावर लाठीमार करणे आणि शेतकर्यांपेक्षा सरकारला खाणार्यांची चिंता वाटणे; याची तीव्र प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविक होते.

देशाच्या अन्य भागातील शेतकरी एवढा पेटून उठला नाही; परंतु पंजाब, हरयाना, राजस्तान आणि उत्तर प्रदेशातील शेतकरी अस्वस्थ झाला. त्याचे कारण हाच शेतकरी किमान आधार किंमतीत अन्न महामंडळाला जास्त शेतीमाल देत असतो. उत्तर प्रदेशामध्ये भाजपचे २९ जागांचे नुकसान झाले. तिथे अखिलेश आणि राहुल यांची धोरणे समजून घेण्यात भाजप अपयशी ठरला. अखिलेश सुरुवातीपासूनच 'पीडीए'म्हणजेच मागास दलित आणि अल्पसंख्याकांच्या समस्यांवर काम करत होते. उत्तर प्रदेशामध्ये पश्चिमेकडून पूर्वांचलपर्यंत आणि अवधपासून बुंदेलखंडापर्यंत भाजपचे नुकसान झाले आहे.

उत्तर प्रदेशामध्ये 'एनडीए'ने पुन्हा ४९ विद्यमान खासदारांना उमेदवारी दिली. मोदी-आदित्यनाथ यांच्या नावावर पुन्हा एकदा संसदेच्या दारात पोहोचण्याचा विश्वास त्यांना होता; पण जनता पुन्हा एकदा आपल्याला मतदान करण्याच्या मन:स्थितीत नाही याची त्यांना कल्पना नव्हती. स्थानिक मुद्दे या खासदारांच्या विरोधात गेले आणि अतिआत्मविश्वास महागात पडला. राम मंदिराचा मुद्दा उपयोगी पडेल, अशी भाजपला आशा होती. रामाच्या नावाने मतदान करण्याऐवजी लोक स्थानिक प्रश्नांवर जास्त मतदान करताना दिसले.

अखिलेश यांनी पेपर फुटण्याच्या प्रकरणाचा तसेच 'अग्नीवीर' नियुक्त्यांचा मुद्दा उपस्थित केला. त्याचा थेट संबंध तरुणांशी होता. पेपरफुटीच्या घटनांनी त्रासलेल्या तरुणांनी पक्षाच्या विरोधात मतदान केले. अखिलेश यांनी जातीय समीकरण डोळ्यासमोर ठेवून उमेदवार ठरवले, त्याचा थेट फायदा दिसून आला. ज्या ठिकाणी ज्या जातीची लोकसंख्या जास्त, त्या जातीच्या उमेदवाराची निवड करण्याची रणनीती अखिलेश यांच्यासाठी कामी आली आणि त्यांनी भाजपवर मात केली. भाजप नेत्यांच्या राज्यघटनेवरील वक्तव्यांनी दलित आणि मागासवर्गीय मतदारांनाही पक्षापासून दूर नेले.

या पराभवामागे पक्षीय मतभेद हेही प्रमुख कारण मानले जात आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी अनेक जागांवर प्रचार केला नाही. पक्षाचे बूथ व्यवस्थापनही अपयशी ठरले. परिणामी, पक्षाच्या भक्कम नेतृत्वाचे 'सीट-टू-सीट' व्यवस्थापन अपयशी ठरले. पंजाबमध्ये तर भारतीय जनता पक्षाला या वेळी खातेही उघडता आले नाही. हरयानामध्येही सदस्यसंख्या दहावरून पाचवर आली. काँग्रेसला जाट मते आपल्याकडे खेचण्यात यश आले. राजस्तानमध्ये लोकसभा निवडणुकीत भाजपला मोठा फटका बसला. तिथे 'इंडिया' आघाडीने ११ जागा जिंकल्यामुळे भाजपची नव्या नेतृत्वाची टीम पूर्णपणे अपयशी ठरली.. राजस्तानमध्ये सवाई माधोपूर, बारमेर-जैसलमेर, चुरू, दौसा, सीकर आदी जागांवर भाजपमध्ये उमेदवारांची निवड चुकली. तिथे भाजपचे नुकसान झाले. राज्याच्या मोठ्या भागात भाजपबद्दल नाराजी होती. व्याप्त काश्मीर, कलम ३७० किंवा राममंदिराची उभारणी यासारखे मुद्दे भाजपला मते मिळवून देऊ शकले नाहीत.

उत्तर प्रदेश, राजस्तान, पंजाब आणि हरयानामधील ग्रामीण भागात मतदारांची संख्या मोठी आहे. हरयानाची ६५.१२ टक्के तर पंजाबची ६२.५२ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. भारतीय जनता पक्षाची पारंपरिक मतपेढी शहरी आणि निमशहरी भागात आहे. भाजपने यंदा पहिल्यांदाच ग्रामीण पंजाबमध्ये नशीब आजमावले. पक्षाकडे या दोन्हीराज्यांत ग्रामीण भागात पाया असलेल्या मजबूत भागीदाराची कमतरता होती. शेतकरी आंदोलनाला याच दोन्ही राज्यांत मोठा प्रतिसाद मिळाला. अनेक ठिकाणी शेतकरी संघटनांच्या नेत्यांनी भाजप नेत्यांना गावात येऊ दिले नाही. निवडणुकीत १५ टक्क्यांनी मताधिक्य वाढवणार्या काँग्रेसला जाट मते एकत्र करण्यात यश आले.

काँग्रेसने भाजपचे 'सोशल इंजिनिअरींग' तोडले. लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपने हरयानामध्ये मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांना हटवले आणि इतर मागास वर्गीय समुदायाला आकर्षित करण्यासाठी नायब सैनी यांची नियुक्ती केली; परंतु त्यांना सत्ताविरोधी लाटेवर मात करता आली नाही.हरयानातील बेरोजगारीचा दर देशात तिसर्या क्रमांकावर आहे. 'मनरेगा'अंतर्गत काम मिळत नसल्याचा आरोप आहे. या वर्षाच्या अखेरीस हरयाना महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत तर पुढील वर्षी जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात दिल्लीमध्ये निवडणुका होणार आहेत. त्यावर या निकालाचा परिणाम होऊ शकतो

हरयानात भाजपसमोर तिसर्यांदा सरकार स्थापन करण्याचे आव्हान असेल. दिल्लीतील जनतेने लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपला सलग तीनदा सातही जागा जिंकून दिल्या; मात्र त्यानंतर विधानसभा निवडणुका आल्या की मतदारांचा प्राधान्यक्रम बदलतो आणि ते आम आदमी पक्षाच्या अरविंद केजरीवाल यांच्याकडे सत्ता सोपवतात. भाजपच्या काही नेत्यांच्या अनावश्यक शेरेबाजीमुळे राजपूत मतदार नाराज होऊन गुजरात, राजस्तानपासून उत्तर प्रदेशपर्यंत भाजपचे मोठे नुकसान झाले. ही दरी भरून काढण्यासाठी भाजपने कोणतेही मोठे प्रयत्न केले नाहीत. भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या 'भाजपला आरएसएसची आता फार गरज नाही; भाजप स्वत: निवडणुकांची तयारी करतो' यासारख्या विधानाने दोन्ही संघटनांमधील अंतर वाढले. त्यामुळेही पक्षाचे नुकसान झाले.

गेल्या दहा वर्षांमध्ये भाजपने स्वत:ला पूर्णपणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कह्यात नेले. याला कॉर्पोरेट संस्कृतीची ब्रँडिंग स्ट्रॅटेजी म्हणतात. त्यात ब्रँड लाँच केल्यानंतर बाजारात कितीही आउटलेट उघडले जातात! पण ही कॉर्पोरेट संस्कृती राजकारणात चालत नाही. भारतासारख्या वैविध्यपूर्ण देशात, विविध जाती, समुदाय आणि वर्गांमध्ये भिन्न मानके आहेत. ते सर्व अशा एका ब्रँडच्या मदतीने हाताळले जाऊ शकत नाहीत.अलीकडे भाजपने आपल्या बड्या नेत्यांना संपवून स्वबळावर निवडणूक जिंकण्याची क्षमता नसलेल्या मोठ्या पदांवर कमी ताकद असलेल्या नेत्यांची नियुक्ती केली. राजस्थानमध्ये पक्षाने आपल्याच मोठ्या नेत्या वसुंधरा राजे शिंदे यांच्याकडे दुर्लक्ष केले. निवडणूक जिंकण्याची कोणतीही योजना नसलेल्या नेत्याला मुख्यमंत्री बनवले.या निवडणुकीत महागाई आणि बेरोजगारी हे सर्वात महत्वाचे मुद्दे होते. जुन्या पेन्शन धोरणामुळे लाखो कर्मचारी भाजपवर नाराज असतानाच सैन्यात नोकरीच्या संधी कमी झाल्या आहेत. सरकारने अग्नीवीर योजनेचे कितीही कौतुक केले, तरी त्याबाबत तरुणांमध्ये प्रचंड नाराजी असल्याचेही आढळले. अशा प्रकारे उत्तरेमध्ये अनेक मुद्दे त्रासदायक ठरुन भाजपचे मोठे नुकसान झाले आहे.

जुन्नर वनहद्दीत पकडलेले २५ पैकी १० बिबटे गुजरातच्या जामनगर मध्ये तर राहिलेले बिबटे इतर ठिकाणी पाठवणार : आ.अतुल बेनके

नारायणगाव :- जुन्नर वन हद्दीतील शिरूर, आंबेगाव, खेड व जुन्नर तालुक्यातील मागील महिन्याभरात पकडलेले २५ पैकी दहा बिबटे गुजरात येथील जामनगर येथे पाठवण्यात येणार असल्याची माहिती आमदार अतुल बेनके यांनी दिली.

जुन्नर तालुका आणि उत्तर पुणे जिल्ह्यातील मानव बिबट संघर्ष उपाययोजना सुचविण्यासाठी गठीत समितीची बैठक शनिवार दिनांक १५ रोजी ' वनभवन ' या मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक पुणे यांच्या कार्यालयात संपन्न झाली. यावेळी आमदार अतुल बेनके यांनी माहिती दिली.

यावेळी जुन्नर तालुक्यातील बिबट हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर सध्या सुरू असलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीला मानव बिबट संघर्ष उपाययोजना समितीचे सदस्य म्हणून जुन्नर तालुक्याचे आमदार अतुल बेनके, शिरूर चे आमदार ड. अशोक पवार उपस्थित होते. बैठकीमध्ये बिबट हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर उपाययोजनांच्या संदर्भात विविध बाबींवर चर्चा करण्यात आली.

या बैठकीबाबत आमदार अतुल बेनके यांनी सविस्तर माहिती दिली.

त्यानुसार बिबटे पकडण्यासाठी पिंजऱ्यांची संख्या वाढवण्या संदर्भातील निर्णयाची

अंमलबजावणी येत्या १ ते दीड महिन्यात पूर्ण होईल. सध्या १५० पिंजरे उपलब्ध आहेत. ही संख्या आता ३०० पिंजरे इतकी होणार आहे हे पिंजरे बनवण्याचे काम देखील सध्या सुरू आहे.

बिबटे पकडण्यासाठी तयार करण्यात आलेल्या टास्कफोर्स साठी जुन्नर तालुक्यातील नगदवाडी आणि शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथे बेस कॅम्प तयार करण्यात आला आहे.

यामध्ये दिसेल तिथे बिबट्या पकडण्याचे आदेश पालकमंत्री अजित पवार यांच्या बैठकीत देण्यात आल्यानंतर गेल्या महिन्याभरात २५ ते २६ बिबटे पकडण्यात वन विभागाला यश आले आहे. यातील १० बिबटे गुजरात मधील जामनगर याठिकाणी पाठविण्यात येणार आहेत आणि राहिलेले बिबटे इतर ठिकाणी पाठवण्याबाबत वरिष्ठ पातळीवर सध्या चर्चा सुरू आहे.

तसेच माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्राचे विस्तारीकरण करून या केंद्रातील बिबट्यांची संख्या वाढवून ती ११० इतकी करण्यात येणार आहे. येत्या ३ महिन्यात हे काम पूर्ण करण्यात येईल.

तसेच बिबट्याच्या नसबंदी संदर्भातील प्रस्तावातील त्रुटींवर काम करून तो प्रस्ताव पुन्हा झउउऋ कडे पाठवण्यात आला आहे. लवकरच हा प्रस्ताव आता केंद्र सरकारकडे पाठवण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून वन विभागासाठी नवीन ७ गाड्या देण्यात येणार आहेत. बेस कॅम्पसाठी नेट (जाळ्या), काठ्या, टॉर्च बॅटरी, ट्रँकुलायझिंग गन, ड्रोन कॅमेरे यासारखे आवश्यक साहित्य पुरविण्यात येणार आहे. तसेच धनगरांच्या वाड्यांसाठी तंबू, टॉर्च बॅटरी हे साहित्य पुरविण्यात येणार आहे.

याशिवाय सध्या प्रशासकीय पातळीवर विविध उपाययोजना राबविण्यासाठी प्रयत्नशील असताना गेल्या १५ दिवसांत दिसेल तिथे बिबट्या जेरबंद करण्याचे आदेश दिल्यानंतर वन विभागाने चांगले काम केले आहे. जुन्नर तालुक्यातील जनतेने सतर्क रहावे बिबट्या दिसल्यास त्वरित वन विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन यानिमित्ताने आमदार बेनके यांनी नागरिकांना केले आहे.

यावेळी समितीचे सदस्य म्हणून जुन्नर तालुक्याचे आमदार अतुल बेनके, शिरूर चे आमदार ड. अशोक पवार, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक पुणे) एन आर प्रविण, सहाय्यक वनसंरक्षक अमित भिसे, दक्षता विभागीय वन अधिकारी श्री. धोत्रे, वन परिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण, वनपरिक्षेत्र अधिकारी वैभव काकडे, वन परिक्षेत्र अधिकारी प्रताप जगताप सायांसह इतर सह अधिकारी उपस्थित होते.

पाटण येथे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर संपन्न

पाटण : जिल्हा आपत्ती प्राधिकरण, सातारा, यशदा पुणे यांचे समन्वयाने पंचायत समिती पाटण येथे पाटणचे प्रांताधिकारी सुनिल गाढे यांच्या मार्गदर्शनाखाली आपत्ती पूर्व तयारी, उपाययोजना या बाबत प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले, या वेळी यशदा कडून लखन गायकवाड, अक्षय चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.

आपत्ती मध्ये सर्वांनी दक्ष राहणे, माहितीची तात्काळ देवाण घेवाण करणे, दरड ग्रस्त भागात जमीन व इतर बाबी ची व लक्षण पाहणी करणे, पूर भागात सर्वांना प्राथमिक सूचना देने, आरोग्य विषयक बाबी तयार ठेवणे, धोकादायक घर मालकांना नोटीस देणे, निवारा शेड व शाळा या ठिकाणी सोयी तयार करणे, जनावराची काळजी घेणे व इतर बाबत प्रशिक्षण मध्ये सूचना दिल्या.

यावेळी पूर व दरड ग्रस्त गावचे, मंडळ अधिकारी, तलाठी, पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका, आशा स्वयम सेविका, ग्रामसेवक, कोतवाल हजर होते. शिबीर यशस्वी करणे करण्यासाठी निवासी नायब तहसीलदार, पंडित पाटील, मंडलाधिकारी विलास गभाले, तलाठी जयेश शिरोडे, दिपक कांबळे व इतर महसूल विभागाचे कार्यकारी यांनी परिश्रम घेतले.

'व्हायोलिन ग्राफी' ला चांगला प्रतिसाद !

भारतीय विद्या भवन,इन्फोसिस फाऊंडेशनचा सांस्कृतिक प्रसार उपक्रम

पुणे : भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत आयोजित ' व्हायोलिन ग्राफी ' या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. निनाद निकेतन म्युझिक अकॅडमी प्रस्तुत या कार्यक्रमात गीत,संगीताचा सुरेल आविष्कार सादर करण्यात आला. निर्मिती, संगीत संयोजन अंजली सिंगडे-राव यांचे होते. ओमकार पाटणकर(कीबोर्ड), विकास क्षीरसागर,नितीन कुलकर्णी (तबला), अभय इंगळे(रिदम),प्रसाद साहोत्रे(गिटार) यांनी साथसंगत केली. आर जे तेजू,प्रफुल्ल कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले.

हा कार्यक्रम शनीवार, दि. १५ जून २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता भारतीय विद्या भवनचे सरदार महादेव बळवंत नातू सभागृह,(सेनापती बापट रस्ता) येथे झाला.हा कार्यक्रम विनामूल्य होता.भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत सादर होणारा हा २१२ वा कार्यक्रम होता.भारतीय विद्या भवनचे मानद सचिव प्रा.नंदकुमार काकिर्डे यांनी कलाकारांचा सत्कार केला.

हंस ध्वनी राग, यमन राग अशी प्रस्तुती प्रारंभी करण्यात आली. ओम जय जगदीश हरे, आओगे तुम साजना ,तुम मिले,चुरा लिया हैं तुमने अशी अनेक बहारदार गीते व्हायोलिन वादनातून सादर करण्यात आली. काही गीतांची झलक दाखविण्यात आली. जागतिक व्हायोलिन दिनाच्या दोन दिवस आधी केलेल्या या सादरीकरणाला उपस्थित रसिकांनी चांगला प्रतिसाद दिला.

रस्ते आणि इमारती बरोबर अनेक संसार उभे करणारा अभियंता

घरे आणि रस्ते इमारती उभा करणारे अभियंते आपण बऱ्याच वेळा पहिले असतील अनुभवले असतील परंतु आपण आज अशा अभियंत्या विषयी माहिती पाहणार आहोत जो घरे, रस्ते आणि इमारती तर उभा करतोच परंतु नाते आणि अनेक संसार त्याने अशा पद्धतीने उभा केले आहेत ज्यात गेल्या काही दशकात भेगा काय साधा तडा सुद्धा गेला नाही यावरून या अभियंत्याची काम करण्याची पद्धत हातोटी आणि कामाचा दर्जा लक्षात येईल. बीड जिल्ह्यातील अत्यंत ग्रामीण भागात असणाऱ्या नवगण राजुरी येथील अत्यंत सामान्य शेतकरी असणाऱ्या निवृत्ती बहीर यांच्या पोटी जन्म घेतलेल्या या अभियंत्याच नाव आहे बप्पासाहेब निवृत्ती बहीर. निवृत्ती बहीर यांच्या संसार वेलीवर यांच्या जन्मापुर्वीही काही फुले उमलललेली होती परंतु या फुलाचे गुणधर्म,स्वभाव,वागण्या बोलण्याची पद्धत,आणि हुशारी वेगळी होती

अगदी लहानपणापासून आपल्या गुणांनी प्रत्येकाच्या हृदयावर अधिराज्य गाजवणाऱ्या याच मुलाने मोठा होऊन प्रत्येक सहकाऱ्याच्या मनावर आपल्या प्रामाणिक कामाने आदर आणि विश्वास कमावला. हिच हुशारी आणि विश्वास आज सबंध महाराष्ट्रात सर्वांना आपल्या कार्याची दखल घ्यायला भाग पाडत आहे .बहीर यांनी राज्यातील अनेक होतकरू तरुणांना शैक्षणिक आणि आर्थिक मदत करून आयुष्यात योग्य दिशा मिळवून दिली आहे त्यामुळे राज्यात चांगले अधिकारी खूप आहेत परंतु आपल्याबरोबर इतरांना अधिकारी होण्यासाठी वाट्टेल ती मदत करणारा आणि अंधारात वाट हरवलेल्यांना दीपस्तंभाप्रमाणे त्यांच्या वाटेत प्रकाशाची पेरणी करणारा राज्यातील अधिकारी म्हणून बप्पा बहिर यांच्याकडे पहिले जाते. शिवाय त्यांनी केलेल्या सहकार्यातून उभा राहिलेले अनेक संसार याची आज कबुली देतील. स्वतःजवळ सर्वकाही असुनही अगदी ज्यांचे पाय जमिनीपासून काही वरती जायला कधीच मागत नाहीत. पद,प्रतिष्ठा,अधिकार, असे सर्व काही पायाशी लोळण घेत असुनही लहानांपासून मोठ्यापर्यंत प्रत्येक व्यक्तीला तितकेच महत्व देणं आणि न सांगता प्रत्येकाच्या सुखात दुःखात स्वतः सहभागी होनारा सर्वार्थाने सक्षम असुनही समोरच्याला आपलाच वाटणारा माणुस मी स्वतः पाहिलाय आणि अनुभवलाय ज्याच नाव आहे बप्पासाहेब बहीर.

छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेऊन विद्यापीठातून प्रथम येवून १९९३ साली लोकसेवा आयोगाची परीक्षा पास करून सेवेत रुजू झालेले बप्पासाहेब बहीर हे आज पुणे परिमंडळ बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता म्हणून जबादारी सांभाळत आहेत. याचा सबंध बीड जिल्ह्याला अभिमान आहे आणि असायला हवा.शालेय जीवनापासून ते शासकीय सेवेत रुजुहोईपर्यंत त्यांनी प्रथम क्रमांक सोडला नाही हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा आणखी एक पैलू.आपल्या कामात ते इतके तरबेज आहेत कि त्यांच्या कामाची दखल सर्वच राजकारणी घेतातच परंतु फलटण-पंढरपूर पालखी मार्गावर मांडवे गावाजवळ ९० मीटर पुलाचे बांधकाम ३८ दिवसात त्यांनी पूर्ण केल्याबद्दल लिमका बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डनेही त्यांच्या कामाची दखल घेतली आहे. त्यामुळे आपल्या कामावर निस्सीम विश्वास आणि श्रद्धा असणारे बहीर हे अल्पावधीत व्यवस्थे मधल्या सर्वांच्या गळ्यातील ताईत झाले आहेत. राज्याच्या बहुतांश भागात त्यांनी सहायक अभियंता,उपभियांता,कार्यकारी अभियंता,आणि सध्या अधिक्षक अभियंता अशा जबाबदाऱ्या पार पडल्या आहेत. असे एकही ठिकाण नाही जिथून बदली झाल्यावर तेथील शिपाई पासुन ते अधिकारी वर्गापर्यंत सर्व कर्मचारी रडले नाहीत, सर्वांच्या मनात स्वताविषयी पराकोटीचा आदर निर्माण करण्यात फार कमी लोक यशस्वी होतात यात बाहीर यांचा नं वरती घ्यावा लागेल. स्वार्थ असल्यावर आपल्या वरिष्ठांची हाजी हाजी तोंडावर करणारे तर खूप असतात परंतु बहीर याला अपवाद आहेत

अगदी बदली होऊन काही वर्ष झाले तरी त्यांची स्तुती करताना त्यांचे तत्कालीन सहकारी थकता थकत नाहीत. यात शिपाई यांच्यापासून ते वरिष्ठ पदस्थांपर्यंत लोकांचा समावेश आहे. यावरून या व्यक्तीची काम करण्याची पद्धत लक्षात येईल. त्यांनी अकलूज येथे कार्यरत असताना अकलूज भुईकोट किल्ल्यात शिवसृष्टी उभारणे, प्रकाशवर्धनी योजना, संगीत कारंजे आदी कामे आजही बहीर यांच्या कामाची साक्ष मोठ्या दिमाखाने देतात. आज पुणे विभागातही मोठ मोठी कामे बाहीर यांच्या नेतृत्वात सुरु आहेत . तेही तुटलेले जोडण्यात हा माणुस प्रचंड पारंगत आहे मग तो रस्ता असो किंवा समुद्र किनारा, माणसांची मने असो वा नाती; तुटले कि यांनी जोडलेच म्हणून समजा त्यामुळे यांना मानवी फेविकॉल म्हंटले तरी वावगे ठरणार नाही.

पुणे,अकलूज,सातारा,रायगड,मुंबई,सोलापूर,रत्नागिरी, बऱ्याच वेळा त्याना राज्य प्रमुखांकडून उत्कृष्ट अभियंता म्हणून गौरविले आहे. आपले काम प्रामाणिक पणे केले तर याची दखल कुठेतरी घेतली जाते यावर त्यांची आढळ श्रद्धा आहे. मुळात कुणीतरी आपल्या कामाची दाखल घ्यावी म्हणून काम करणे मला आवडत नाही काम हे आपली जबाबदारी आहे आणि ती प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजे हे सूत्र मी आजपर्यंत माझ्या शासकीय आणि वैयक्तिक आयुष्यात काम करताना जपले आहे. एखाद्या कामात आपण स्वतः ला झोकून दिले कि ते काम आपल्या बरोबर इतरांच्याही मनासारखे होते आणि

त्याचे समाधानही शब्दात वर्णण करता न येणारे असते म्हणून कामाचा आनंद घेवून काम करा ते काम यशस्वी होते.यावरून लक्षात येईल बहिर हे किती प्रामाणिक पणे आणि तळमळीने काम करताहेत आणि त्यांची काम करण्याची हीच पद्धत त्याना इतर अभियंत्यापासून वेगळी करते.

आज पुण्यात काही प्रस्तावित आणि काही पूर्णत्वास येणाऱ्या कामांमध्ये सारथी मुख्यालय,नवीन कृषी भवन,शिक्षण आयुक्तालय,जमाव बंदी आयुक्तालय कार्यालय,सहकार भवन,नोंदणी भवन,जिल्हाधिकारी कार्यालय,व्ही व्ही आय पी सर्किट हाउस,सारथी प्रादेशिक कार्यालय, ऑलंपिक भवन,पिंपरी चिंचवड न्याय संकुल,फौजदारी न्यायालय येरवडा,अंगार आयुक्तालय,प्रादेशिक मनो रुग्णालय अशी अनेक कामे पुर्नात्वास आहेत काही पूर्ण झाली आहेत.

बप्पासाहेब बहिर यांना आजपर्यंत शासकीय,निमशासकीय,आणि अशासकीय अशा अनेक पुरस्काराने सन्मानित केले गेले आहे यात २०१४ मध्ये महाराष्ट्र शासनाचा आदर्श अभियंता पुरस्कार, अवसरी खुर्द (ता. आंबेगाव) येथील ५० आयसीयू आणि ३५० ऑक्सिजन बेडचे शिवनेरी जम्बो कोविड सेंटरची स्थापना केवळ २१ दिवसांत अशक्यप्राय गोष्ट शक्य केल्याबद्दल त्यांना तत्कालीन गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते बहिर यांना गौरवण्यात आले.माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याहस्ते उत्कृष्ट अभियंता म्हणूनही गौरविण्यात आले आहे. बीड जिल्ह्या सारख्या अत्यंत ग्रामीण भागातून कठीण परिस्थितीशी दोन हात करून आज आपल्या कार्य कुशलतेने सबंध महाराष्टातील नेत्यांनाच नाही तर लोकानांही आपल्या प्रामाणिक कार्याची दखल घ्यायला लावणाऱ्या अशा अवलिया अभियंत्यास जन्मदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा.....**शब्दांकन ब. रा.पाटील**

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

यावर्षी खरिपातही आघाडी घेणार फलटण तालुका

फलटण : फलटण तालुक्यात यावर्षी मान्सून पूर्व पावसाने दमदार सुरुवात केली असून आतापर्यंत सरासरी १४६ मि. मी. पावसाची नोंद झाली आहे. आणखी काही दिवस हा पाऊस असाच चालू राहिला तर जनावरे व लोकवस्तीच्या पिण्याच्या पाण्याची समस्या टप्प्याटप्याने दूर होऊन टँकरची संख्या कमी होईल. दरम्यान यावर्षीही फलटण तालुका खरीप हंगामात आघाडी घेण्याची चिन्हे आहेत. कृषी खात्याने जय्यत तयारी केली असून खते-बी-बियाणे उपलब्ध करून दिले आहेत.

नीरा-उजवा कालवा उन्हाळी आवर्तन सुरु असताना गळती लागल्याने अचानक बंद झाल्याने प्रामुख्याने उभ्या ऊसाचे क्षेत्र संकटात सापडले होते त्याला काही प्रमाणात आधार मिळणार आहे, मात्र एवढ्या पावसावर ऊस वाढणार नसला तरी पीक हातचे जाण्याचा धोका टळला आहे इतकेच. फलटण हा तसा रब्बीचा तालुका, ऑगस्ट सप्टेंबर मध्ये झालेल्या परतीच्या मान्सूनवर अवलंबून असलेल्या या तालुक्यात संपूर्ण वर्षात ३५०/४०० मि. मी. इतका कमी पाऊस पडतो, त्यावर रब्बीची पिके येतात, मात्र या तालुक्याला कृष्णा, कोयना वगैरे नद्यांवर वाई, भोर तालुक्यात बांधलेल्या भाटघर, नीरा-देवघर, वीर, धोम- बलकवडी, गुंजवणी या धरणांच्या पाण्याचा लाभ मिळत असल्याने या तालुक्यातून दरवर्षी सुमारे २० हजार हेक्टर क्षेत्रावर ऊसाचे पीक घेतले जाते. पाटबंधारे खात्याच्या माध्यमातून आतापर्यंत तालुक्यातील १२७ गावांपैकी ३५ गावातील शेतीला पाणी मिळत असल्याने बागायती क्षेत्रात मोडणाऱ्या या मोजक्या क्षेत्रात ऊस, कापूस वगैरे नगदी पिके घेतली जात असली तरी उर्वरित संपूर्ण तालुका सन २०२० पर्यंत जिरायती पट्ट्यात मोडणारा होता. ऑगस्ट २०२० मध्ये नीरा - देवघर व धोम - बलकवडी धरणांचे पाणी फलटण तालुक्यात पोहोचले आहे, मात्र दोन्ही प्रकल्पांच्या कालव्यांची कामे अपूर्ण असल्याने नीरा - देवघरचे पाणी नीरा उजवा व डावा कालव्यातून फलटण, माळशिरस, सांगोला, पंढरपूर, बारामती, इंदापूर या तालुक्यांना देण्यात आल्याने मूळ बागायती क्षेत्रात अधिक पाणी मिळाल्याने क्षेत्रात वाढ होण्याबरोबर ऊसा खालील क्षेत्रात भरीव वाढ झाली. परिणामी पूर्वीच्या २ साखर कारखान्यांच्या जागी आता ४ साखर कारखाने तालुक्यातील ऊसाचे गाळप करीत असताना पूर्वीच्या दोन्ही साखर कारखान्यांची गाळप क्षमता २ अडीच हजार मे. टन वरुन प्रतिदिन १० हजार पर्यंत वाढविण्यात आली आहे, तर नवीन दोन्ही साखर कारखाने सुरुवाती पासून प्रतिदिन १० हजार मे. टन गाळप क्षमतेचे आहेत.

आता दोन्ही पाटबंधारे प्रकल्पांच्या कालव्यांची कामे सुरु झाली असून आगामी वर्षभरात पाणी खऱ्या अर्थाने लाभ क्षेत्रात पोहोचणार आहे, त्यावेळी कायम दुष्काळी पट्टा बागायती होणार असल्याने आगामी २/४ वर्षात संपूर्ण फलटण तालुका १०० टक्के बागायती होणार आहे. त्याच बरोबर धोम-बलकवडी प्रकल्पात मूळ नियोजनाप्रमाणे नीरा-देवघर प्रकल्पातून ०.९३ टीएमसी पाणी सोडण्याची योजना मंजूर होऊन प्रत्यक्ष त्या कामाला सुरुवात झाल्याने या प्रकल्पाचे लाभ क्षेत्र ४ माही ऐवजी यावर्षी आठमाही होणार असल्याने त्या भागात ऊसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर वाढणार हे निश्चित. अलीकडे निसर्ग बदलत असल्याने पाऊस, हवामान, ऋतुमान किंवा रब्बी व खरीप हंगाम अशी परिस्थिती राहिली नाही. एकाच तालुक्यात पावसाची वेगवेगळी परिस्थिती असते, काही ठिकाणी भरपूर पाऊस पडतो, काही ठिकाणी कमी तर काही ठिकाणी अजिबात नाही अशी पावसाची स्थिती बऱ्याच वेळा अनुभवावी लागत असल्याने कोणता तालुका रब्बीचा किंवा कोणता तालुका खरिपाचा असे सांगता येणे कठीण परिस्थिती राहिली नाही. साधारणपणे पुरेसा अथवा समाधान कारक पाऊस झाल्याची खात्री करुन शेतकरी आपल्या क्षेत्रात पिके घेतो, त्यामुळे कोणता हंगाम यापेक्षा घेतो आहोत ते पीक समाधानकारक येईल याची खात्री करुन पेरणी केली जाते. फलटण तालुक्यात गेल्या ५/६ दिवसात झालेल्या पावसाने दुष्काळाचे चित्र पालटत असताना बळीराजा खरीप बाजरी, मका, सूर्यफूल, सोयाबीन, कडधान्य आणि नगदी पीक म्हणून कापूस लागवडी साठी प्रयत्नशील राहील अशी अपेक्षा आहे. दरम्यान बागायती पट्ट्यात उभा ऊस जोपासण्याचा प्रयत्न राहील अशी अपेक्षा आहे.

फलटण तालुक्यात खरिपाचे सर्वसाधारण क्षेत्र २० हजार ४०८ हेक्टर आहे, तथापि उपलब्ध पाणी साठे, झालेला पाऊस, संभाव्य पाऊस असा विचार करुन तालुक्यात यावर्षी १७ हजार ७२६ हेक्टर क्षेत्रावर खरिपाचा पेरा होईल अशी अपेक्षा आहे. प्रामुख्याने खरीप बाजरीचे सर्वसाधारण क्षेत्र १४ हजार ८४३ हेक्टर असले तरी संपूर्ण क्षेत्राऐवजी सुमारे ६०/६५ टक्के क्षेत्रावर म्हणजे ८ हजार ९३५ हेक्टर क्षेत्रावर बाजरीचा पेरा होईल अशी अपेक्षा आहे, तर पशू खाद्य व अन्य उत्पादनासाठी मक्याला मागणी वाढत असल्याने तसेच दुग्ध व्यवसाय वाढत असल्याने हिरवा ओला चारा म्हणूनही मक्याला मागणी वाढत असल्याने मक्याचे सर्वसाधारण क्षेत्र ४ हजार ४९० हेक्टर असले तरी ६ हजार २५० हेक्टर क्षेत्रावर मका लागणी होतील अशी अपेक्षा आहे. अलीकडे ऊसाचे वाढते क्षेत्रामुळे ऊस लागण व जोपासणे पेक्षा ऊसाचे हार्वेस्टिंग कठीण झाले आहे, कोणताही कारखाना वेळेवर ऊस नेईल याची खात्री राहिली नाही, तोड आल्यावर तोडणी वाहतुकीसाठी द्यावे लागणारे पैसे, त्यातूनही होणारी अडवणूक, ऊस वजनातील गफलतीच्या चर्चा, अगोदर वर्ष - दीडवर्ष करावा लागणारा वारेमाप खर्च, पाटबंधारे खात्याचे पाणी वेळेवर, पुरेसे मिळेल याची खात्री राहिली नाही, या पार्श्वभूमीवर ऊसाला पर्याय शोधणाऱ्या शेतकऱ्यांना कापूस हे उत्तम पीक सापडले असल्याने त्याच्या क्षेत्रात दिवसेंदिवस वाढ होत आहे.

फलटण तालुक्यात सुमारे २०/२५ वर्षांपूर्वी ऊसा पेक्षा कापसाचे क्षेत्र मोठे होते, त्यावर पडलेल्या रोगराई मुळे क्षेत्र घटले आणि येथून हद्दपार झाले, पण आता पुन्हा कापसा खालील क्षेत्रात वाढ होऊ लागली असल्याने शासनाने त्याच्या खरेदी व प्रक्रियेची व्यवस्था केली तर या पिकाखालील क्षेत्रात भरीव वाढ अपेक्षीत आहे. तालुक्यात कापसाचे सर्वसाधारण क्षेत्र केवळ २१ हेक्टर असले तरी यावर्षी सुमारे १५०० ते २००० हेक्टर क्षेत्रावर कापूस होईल अशी अपेक्षा आहे.

फलटण तालुक्यात कडधान्य उत्पादन घेतले जाते त्यामध्ये तुर १८८ हेक्टर, उडीद १२७ हेक्टर, मूग ६८ हेक्टर, घेवडा ४७ हेक्टर सर्वसाधारण क्षेत्र असून त्याप्रमाणे पेरणी अपेक्षीत आहे, अलीकडे वाटाण्याच्या क्षेत्रात वाढ होत आहे. सर्वसाधारण क्षेत्र ३३ असले तरी साधारण ४५/५० हेक्टरवर वाटाणा होईल अशी अपेक्षा आहे. भुईमुग, सोयाबीन, सूर्यफूल या तेलबिया पिकांचे सर्वसाधारण क्षेत्र अनुक्रमे ६४, ४७५ व ५२ हेक्टर आहे, त्यामध्ये सोयाबीनच्या क्षेत्रात वाढ अपेक्षित आहे. फलटण तालुक्यात सुमारे ३ हजार हेक्टर क्षेत्रावर विविध फळबागा उभ्या असून शेतकऱ्यांना समाधानकारक लाभ देण्यात हे क्षेत्र आघाडीवर असले तरी फळ प्रक्रिया उद्योगांची उभारणी येथे झाली तर फळबागांखालील क्षेत्रात मोठी वाढ तर होईल पण त्याच बरोबर शेतकऱ्यांच्या सुशिक्षित मुलांना उद्योजक आणि या उद्योगात करियर करण्याची नवी संधी मिळेल, तालुक्याच्या औद्योगिक क्षेत्रात सहज झालेली भरीव वाढ तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला गती देवू शकेल त्यासाठी शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. फलटण तालुक्यात आज आंब्या खालील क्षेत्र सुमारे ५०० हेक्टर, नारळ ६१३ हेक्टर, सीताफळ ३०० हेक्टर, चिक्कू ८० हेक्टर, पेरु १७० हेक्टर, डाळिंब ६६५ हेक्टर, आवळा २८ हेक्टर, चिंच ४२ हेक्टर, शेवगा ८५ हेक्टर, मोसंबी ४ हेक्टर, अंजीर २० हेक्टर, जांभूळ १५ हेक्टर, लिंबू ३३ हेक्टर, द्राक्ष १२० हेक्टर असून यापैकी आंबा, डाळिंब, पेरु, अंजीर क्षेत्रात सतत वाढ होत असून येथील तैवान पेरु उत्पादनाला देशात व देशाबाहेर मोठी मागणी आहे. फलटण तालुक्यात ऊसाचे क्षेत्र सुमारे १५ हजार हेक्टर पेक्षा अधिक असून त्यामध्ये ६ हजार ७९० हेक्टर आडसाली, ३ हजार १५४ हेक्टर पूर्वहंगामी, २ हजार १७४ हेक्टर सुरु आणि ३ हजार ८० हेक्टर खोडवा अशी वर्गवारी आहे.

फलटण शहरातून जाणाऱ्या पालखी महामार्गाकडे लक्ष देण्याची मागणी

फलटण : संत शिरोमणी ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहोळा आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आळंदी - पंढरपूर - मोहोळ राष्ट्रीय महामार्गाचे (पालखी महामार्ग) काम वेगात सुरु असताना फलटण शहरातील ज्या मार्गावरुन हा सोहोळा जाणार त्याकडे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यंत्रणेचे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे, त्याबाबत तातडीने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

आळंदी - पंढरपूर - मोहोळ राष्ट्रीय महामार्ग (पालखी महामार्ग) फलटण शहरातून न नेता शहराच्या प्रारंभी तांबमाळ येथून शहराबाहेरुन सस्तेवाडी, चौधरवाडी, धूळदेव, विडणी मार्गे पुन्हा महामार्गाला जोडण्यात येणार आहे, तथापि हा बाह्यवळण मार्ग शहरातून जाणाऱ्या पालखी महामार्गावरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी निर्माण करण्यात येत असल्याचे स्पष्ट झाले आहे,

साहजिकच त्यामुळे संत शिरोमणी ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहोळा नेहमीच्या मार्गावरुन तांबमाळ, जिंती पूल, महतपुरा पेठ (मलठण), सद्गुरु हरीबुवा महाराज मंदिर, पाचबत्ती चौक, श्रीराम मंदिर, गजानन चौक, म. फुले चौक, गिरवी नाका या मार्गाने विमान तळ या पालखी तळावर पोहोचणार आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी सोहळा पालखी तळावरुन गिरवी नाका, डी. एड. चौक, संत ज्ञानेश्र्वर मंदिर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छ. शिवाजी महाराज चौक या मार्गाने क्रांतिसिंह नाना पाटील चौकातून पंढरपूर कडे मार्गस्थ होतो.

शहरातून जाणाऱ्या या संपूर्ण पालखी मार्गाची दुरुस्ती व सुशोभीकरण करण्याची मागणी केंद्रीय रस्ते बांधणी मंत्री ना. नितीन गडकरी फलटण मध्ये आले असताना आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर व खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी त्यांच्याकडे केल्यानंतर ना. गडकरी यांनी त्याबाबत सहमती दर्शविली होती.

त्यानंतरच्या कालावधीत खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी सतत पाठपुरावा करुन सदर निधी मंजूर करुन घेतला आहे, मात्र मुख्य रस्त्याच्या कामाबाबत पाहणी व चर्चा सुरु असताना शहरातून जाणाऱ्या या पालखी महामार्गाकडे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने लक्ष देवून सदरच्या शहरातून जाणाऱ्या रस्त्याची किमान दुरुस्ती करुन त्यावरील खड्डे बुजविण्याची गरज आहे.

(शनिवारी) झालेल्या पावसाने राष्ट्रीय महामार्गावरील (पालखी महामार्ग) शहरालगतच्या खडक हिरा ओढ्याला आलेल्या पुरामुळे व झालेल्या चिखलामुळे वाहन चालकांची तारांबळ उडाली होती. आगामी काळात पाऊस सुरु राहिला तर सोहळ्याच्या येथील वास्तव्य व पुढे मार्गस्थ होताना दिंडीकरी, वारकरी, भाविकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागणार आहे. त्यासाठी शहरातून जाणाऱ्या या पालखी महामार्गाची किमान तात्पुरती दुरुस्ती करण्याची मागणी होत आहे.

मतदार नोंदणी प्रशिक्षण कार्यशाळेला चांगला प्रतिसाद

पुणे : मतदारांच्या प्रभावी आणि संघटीत जनआंदोलनातून आगामी विधानसभा निवडणूकीत महाराष्ट्रात सत्तापरिवर्तन करण्याच्या हेतूने भारत जोडो अभियानच्या वतीने मतदार नोंदणी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.रविवार, १६ जुन २०२४ रोजी ,दुपारी अडीच वाजता साने गुरुजी स्मारक, दांडेकर पुलाजवळ, पुणे येथे ही कार्यशाळा झाली.

ऋषिकेश येवलेकर यांनी या कार्यशाळेत सहभागी झालेल्या सहभागींना मार्गदर्शन केले. या वेळी संदीप बर्वे यांनी प्रास्ताविक केले.ऋषिकेश येवलेकर म्हणाले संविधानाने भारतीय नागरिकांना सर्वात महत्वाचा दिलेला अधिकार म्हणजे मतदान करणे हा आहे. मतदार यादीत नाव नसणे म्हणजे एक प्रकारचा मृत्यूच होय. त्यामुळे मतदार यादी मध्ये आपले नाव आहे की नाही, हे आपण आपल्या मोबाईलवर 'व्होटर हेल्पलाईन' या ऍप द्वारे घरबसल्याही तपासून बघता येते.'आपल्याकडे निवडणूक ओळखपत्र असेल तर त्यावरील एपिक नंबर या ऍप मध्ये टाकून आपले नाव या यादीत आहे की नाही हे तपासून पाहता येते' अशीही माहिती येवलेकर यांनी दिली.निवडणूक ओळखपत्रावरील क्यू आर कोड द्वारे सुद्धा आपले नाव मतदार यादीत आहे की नाही हे तपासता येते, नवीन मतदार नोंदणीसाठी सहा नंबरचा अर्ज याच ऍप वर मोबाईल वरून भरता येईल.

विद्यार्थ्यांसोबत उपस्थित असलेले मान्यवर (छाया: शुभम गुरव)

अंबवडे सं.वा जि.प.शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

गटशिक्षणाधिकारी धनंजय चोपडे यांच्याकडून शाळेचे कौतुक

आसनगाव : पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंबवडे संमत वाघोली या शाळेचा सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम तसेच शाळा प्रवेशोत्सव व विद्यार्थी नवागतांचे स्वागत आणि हा कार्यक्रम दिनांक १४ जून २०२४ रोजी अंबवडे गावातील पवित्र अशा श्री विश्वात्मक जंगली महाराज आश्रम (मठ) या ठिकाणी घेण्यात आला.

यावेळी गटशिक्षणाधिकारी धनंजय चोपडे यांनी शाळेने विविध जिल्हास्तर व तालुकास्तरावरील उपक्रमात मिळवलेल्या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शाळेचे कौतुक केले. तसेच पुस्तकी ज्ञानाबरोबर विध्यार्थ्यांना स्वयंपुर्ण बनविणारे शिक्षण देणे काळाची गरज असल्याचे नमुद केले. यावर्षी शाळेने यशवंतराव चव्हाण विद्यार्थी व्यक्तीमत्व विकास स्पर्धेत वक्तृत्व,निबंध,लोकनृत्य,पोवाडा गायन ,रस्सिखेच तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेशदिननिमित्त वक्तृत्व स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरासाठी निवड झाली. स्वच्छ सुंदर उपक्रमशिल गुणवत्तापुर्ण शाळा स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला असून जिल्ह्यात यशाची खात्री आहे.

उल्लेखनीय कार्याची सातारा आकाशवाणीकडून दखल

शाळेतील विध्यार्थ्यांचा क- कमाल, ध- धमाल हा कार्यक्रम आकाशवाणीकडून प्रसारीत करण्यात आला असून कोरेगाव तालुक्यातून पीएम श्री स्कूल म्हणून एकमेव शाळेची निवड झाली असून शाळा विकासाचे काम प्रगतीपथावर आहे.

बालनाट्य, गीतमंच द्वितीय क्रमांक तालुक्यात मिळवला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध प्रकारच्या नृत्यांचा अविष्कार या ठिकाणी सादर करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी विश्वात्मक जंगली महाराज आश्रम या मठाचे संस्थापक श्री ब्रह्मानंद बाबा ,गटशिक्षणाधिकारी धनंजय चोपडे तसेच मुधाई देवी हायस्कूल देऊर शाळेचे प्राचार्य प्रदीत ढाणे सर, अंबवडे हायस्कूल चे मुख्याध्यापक चेतन चव्हाण सर,विषय समन्वयक किशोर मोटे सर, सरपंच सौ. शुभांगी सकुंडे, उपसरपंच दत्तात्रय लांडगे व सर्व ग्रामपंचायत सदस्य,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष लक्ष्मण सकुंडे व उपाध्यक्ष सदस्य,पालक व सर्व ग्रामस्थ विद्यार्थी तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.छाया चव्हाण मॅडम ,सहकारी शिक्षिका सौ. सत्वशिला गायकवाड,वर्षा सलगरे,ज्योत्स्ना फडतरे यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा दिमाखात पार पडला.

सोळशी वैचारिक संस्काराचे केंद्र : ना. महेश शिंदे

शनैश्वर कृतज्ञता पुरस्काराचे वितरण: शनी जयंतीला भाविकांची अलोट गर्दी

पिंपोडे बुद्रुक : एका बाजूला आपल्याला प्रचंड भौतिक सुविधा मिळत आहेत, त्यातून आपण विकृतीला बळी पडत आहोत. अध्यात्मिक व धार्मिक ठिकाण वैचारिक संस्काराचे काम करत आहेत. समाजातील मानसिकता संतुलित ठेवण्याचे फार मोठे काम साधू संत करत आहेत. आजच्या तरुण पिढीला, मुलांना संस्कारक्षम शिक्षणाची गरज आहे, असे प्रतिपादन राज्याच्या कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष आमदार महेश शिंदे यांनी व्यक्त केले.

विविध उपक्रम व विविध मान्यवरांना पुरस्कार वितरण प्रसंगी शनैश्वर देवस्थानचे मठाधिपती नंदगिरी महाराज, सुंदरगिरी महाराज आणि मान्यवर.

सोळशी (ता. कोरेगाव) येथे शनैश्वर जयंती सोहळा साधुसंत-महंत, प्रमुख मान्यवर आणि भाविकांच्या अलोट गर्दीने उत्साहात झाला. या उत्सवाच्या निमित्ताने शनैश्वर कृतज्ञता पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ना. महेश शिंदे यांनी विचार व्यक्त केले. याप्रसंगी पुसेगावच्या सेवागिरीचे मठाधिपती सुंदरगिरी महाराज, शिवयोगी वाईकर महाराज, ज्ञानदिप कॉपरेटीव्ह क्रेडीट सोसायटीचे विश्वनाथ पवार, छत्रपती संभाजी महाराज सहकारी पतसंस्थेचे संस्थापक रामभाऊ लेंभे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यंदाचा उन्हाळा अतिशय कडक असला, तरी सर्व भक्ताना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची खबरदारी देवस्थानच्या वतीने घेण्यात आली होती. देवस्थान ट्रस्टमार्फत व पुष्पक को ऑपरेटिव्ह सोसायटी यांच्या सौजन्याने भाविकांसाठी स्वच्छ पिण्याचे पाणी, लाईट व जनरेटर, दर्शनबारी, वाहनतळ व्यवस्था, परिसर स्वच्छता, जादा कर्मचारी, स्वयंसेवक, वाहतूक पोलिस आदींचे नियोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते आणि धार्मिक स्थळासह सामाजिक प्रबोधनाचे अधिष्ठान म्हणून नावारूपास सोळा शिवलिंगी श्री शनैश्वर देवस्थान परिसरात शनिदेवांच्या दर्शनासाठी भाविक भक्तांनी अलोट गर्दी केली होती. मठाधिपती प.पू.शिवयोगी नंदगिरी महाराज यांच्या संकल्पनेतून शनि जयंतीनिमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

बुधवार दि.५ जून रोजी गोपूजन, धर्मध्वजारोहण आणि सुश्राव्य भजनांचा कार्यक्रम झाला तर बुधवार दि. ६ जून रोजी सकाळी सर्वोदय पूजा, ५२ पात्री लघुरूद्र अभिषेक, पुणर्णाहूती, महाआरती व महाप्रसाद, त्यानंतर उपस्थित संत महंत यांना अन्नदान, वखदान करण्यात आले. याप्रसंगी बोलताना मठाधिपती नंदगिरी महाराज म्हणाले, शनीदेवाची सर्वांवर कृपादृष्टी राहिली आहे.

शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणार परिणाम

भोर - भोर तालुका सह्याद्रीच्या डोंगर रांगानी व्यापलेला आहे. दळणवळण व विकासाच्या दृष्टीने मागासलेला असून बहुतांशी लोक खेडोपाड्यात वाड्या वस्त्यांवर वास्तव्यास आहेत.पर्यायी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिकदृष्ट्या जिल्हा परिषद शाळाना खूप महत्त्वाचे स्थान असून विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी नवसंजीवनी ठरत असल्या तरी मात्र जिल्हा परिषद प्रशासनाच्या वेळ- काढूपणा व नियोजनशून्य कारभारामुळे भोर तालुक्या तील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये सन २०२३- २४ या शैक्षणिक वर्षात शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणा त रिक्त होती परंतु तीच परिस्थिती सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात राहणार असल्यामुळे शाळेच्या पहिल्या दिवशी म्हणजे १५ जूनपासून शिक्षकांवर ताण येणार असल्यामुळे याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणार आहे. परिणामी पालकांचा इंग्लिश शाळांकडे कल वाढलेला असून यामुळे भविष्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची पटसंख्यादेखील रोडावण्याची शक्यता असून याला जबाबदार कोण ?. असा सुर पालकांकडून निघत आहे.

सध्याच्या स्पर्धेच्या युगात, बदलत्या काळात पालकांचा पाल्यांसाठी इंग्लिश शाळांकडे वाढलेला कल आणि त्यातच शासनाने आरटीई मध्ये इंग्लिश शाळांचा केलेला समावेश व शैक्षणीक क्षेत्रात वाढलेली मोठी चुरस असताना भोर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या २७२ शाळांमधील शिक्षकांच्या मंजूर असलेल्या ७८३ पदांपैकी २८१ पदे रिक्त असल्यामुळे कार्यरत असलेल्या शिक्षकांवर कामाचा ताण पडत आहे. यामुळे तालुक्यातील शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरावीत आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे, असे वेळोवेळी जिल्हा परिषदेकडे निवेदन देऊन मागणी केली जाते. परंतु यावर आतापर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही.मात्र समानीकरण नियमानुसार शिक्षकांची भरती केल्यानंतर इतर तालुक्यातील शाळेतील अतिरिक्त शिक्षक दुर्गम डोंगरी भागात येऊ शकतात. परंतु या नियमाचे वरिष्ठ पातळीवर उल्लंघन होत असल्यामुळे तालुक्यात मागील वर्षी ४२ शाळा या शून्यशिक्षकी शाळा होत्या यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुक - सान झाले. तालुक्यातील डोंगराळ आणि अतिदुर्गम भागातील शिक्षकांची २३५ पदे रिक्त आहेत. यामध्ये ६ मुख्याध्यापक, ५८ पदवीधर शिक्षक आणि १४३ उपशिक्षकांचा समावेश आहे. याशिवाय तालुक्यातील ४२ शाळांवर शिक्षकच नाहीत. त्यामुळे शेजारच्या शाळेतील शिक्षक हे तेथे पाठविले जात आहेत. त्यामुळे कार्यरत शिक्षकांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत असून, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. सध्या पवित्र पोर्टलद्वारे जिल्ह्यात नेमणूक मिळालेल्या शिक्षकांपैकी जास्तीत जास्त शिक्षकांची नेमणूक भोर तालुक्यात करावी, अशी मागणी शिक्षक संघटनेने केली आहे. तालुक्यात सध्या ४८ शिक्षक मिळाले असून ते आज व मंगळवार पर्यंत रुजू होणार आहेत. ज्या त्या शाळेच्या हद्दीतील सर्वेक्षण करुन दाखल पात्र विद्यार्थ्यांची यादी तयार केली असून संबंधित शाळांना दिली असल्याने योग्य नियोजन झाले आहे.

जिल्ह्यातील शाळा दि. १५ जूनपासून सुरू होत असून भोर तालुक्यात शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे प्रमाण जास्त आहे.पवित्र पोर्टलनुसार भोर तालुक्यात ४८ शिक्षकांची नव्याने नियुक्ती झाली असून हे शिक्षक शाळेच्या पहिल्या दिवसापासून शाळेवर रुजू होणार आहेत.

- संजय नायकोडी
शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद पुणे

सोळशी वैचारिक संस्काराचे केंद्र : ना. महेश शिंदे

शनैश्वर कृतज्ञता पुरस्काराचे वितरण: शनी जयंतीला भाविकांची अलोट गर्दी

पिंपोडे बुद्रुक : एका बाजूला आपल्याला प्रचंड भौतिक सुविधा मिळत आहेत, त्यातून आपण विकृतीला बळी पडत आहोत. अध्यात्मिक व धार्मिक ठिकाण वैचारिक संस्काराचे काम करत आहेत. समाजातील मानसिकता संतुलित ठेवण्याचे फार मोठे काम साधू संत करत आहेत. आजच्या तरुण पिढीला, मुलांना संस्कारक्षम शिक्षणाची गरज आहे, असे प्रतिपादन राज्याच्या कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष आमदार महेश शिंदे यांनी व्यक्त केले.

विविध उपक्रम व विविध मान्यवरांना पुरस्कार वितरण प्रसंगी शनैश्वर देवस्थानचे मठाधिपती नंदगिरी महाराज, सुंदरगिरी महाराज आणि मान्यवर.

सोळशी (ता. कोरेगाव) येथे शनैश्वर जयंती सोहळा साधुसंत- महंत, प्रमुख मान्यवर आणि भाविकांच्या अलोट गर्दीने उत्साहात झाला. या उत्सवाच्या निमित्ताने शनैश्वर कृतज्ञता पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ना. महेश शिंदे यांनी विचार व्यक्त केले. याप्रसंगी पुसेगावच्या सेवागिरीचे मठाधिपती सुंदरगिरी महाराज, शिवयोगी वाईकर महाराज, ज्ञानदिप कॉपरेटीव्ह क्रेडीट सोसायटीचे विश्वनाथ पवार, छत्रपती संभाजी महाराज सहकारी पतसंस्थेचे संस्थापक रामभाऊ लेंभे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यंदाचा उन्हाळा अतिशय कडक असला, तरी सर्व भक्ताना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची खबरदारी देवस्थानच्या वतीने घेण्यात आली होती. देवस्थान ट्रस्टमार्फत व पुष्पक को ऑपरेटिव्ह सोसायटी यांच्या सौजन्याने भाविकांसाठी स्वच्छ पिण्याचे पाणी, लाईट व जनरेटर, दर्शनबारी, वाहनतळ व्यवस्था, परिसर स्वच्छता, जादा कर्मचारी, स्वयंसेवक, वाहतूक पोलिस आदींचे नियोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते आणि धार्मिक स्थळासह सामाजिक प्रबोधनाचे अधिष्ठान म्हणून नावारूपास सोळा शिवलिंगी श्री शनैश्वर देवस्थान परिसरात शनिदेवांच्या दर्शनासाठी भाविक भक्तांनी अलोट गर्दी केली होती. मठाधिपती प.पू.शिवयोगी नंदगिरी महाराज यांच्या संकल्पनेतून शनि जयंतीनिमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

बुधवार दि.५ जून रोजी गोपूजन, धर्मध्वजारोहण आणि सुश्राव्य भजनांचा कार्यक्रम झाला तर बुधवार दि. ६ जून रोजी सकाळी सर्वोदय पूजा, ५२ पात्री लघुरूद्र अभिषेक, पुणर्णाहूती, महाआरती व महाप्रसाद, त्यानंतर उपस्थित संत महंत यांना अन्नदान, वखदान करण्यात आले. याप्रसंगी बोलताना मठाधिपती नंदगिरी महाराज म्हणाले, शनीदेवाची सर्वांवर कृपादृष्टी राहिली आहे.

युवकाचा धारदार शस्त्राने भोसकून खून

कोल्हापूर : धारदार शस्त्राने सपासप भोसकून संकेत खामकर वय १९, रा.पाडळी, ता.हातकणंगले या युवकाचा खून करण्यात आला. पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरील सांगली फाटा, पुलाची शिरोली येथील बुधले मंगल कार्यालय समोर रात्रीच्या सुमारास ही घटना घडली.

याबाबतची घटनास्थळावरून व पोलिसांनी दिलेली माहिती अशी, पेठवडगाव येथील एका मुलीशी संकेत चे प्रेमसंबध होते. त्या मुलीच्या नातेवाईकांचा पुलाची शिरोलीतील बुधले मंगल कार्यालयात बारश्याचा कार्यक्रम होता.संकेत हा मुलीला भेटण्यासाठी गावातील एका मित्राला सोबत घेवून बुधले मंगल कार्यालयात आला असल्याचे नातेवाईकांना समजले. मुलीचे नातेवाईक व संकेत यांच्यात वाद झाला.या वादातून नातेवाईकांनी त्याच्यावर धारदार शस्त्राने सपासप हल्ला सुरू केला. हल्ला इतका जोरदार होता की संकेत रक्ताच्या थारोळ्यात पडला. सदरची घटना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घटना घडली.या तरुणावर हल्ला होत असताना हल्लेखोरांना रोखण्यासाठी कोणीच पुढे आले नाही. घटना पाहून घाबरलेल्या त्याचे मित्राने तेथून पळ काढला. त्याने शिरोली येथून एका अनोळखी व्यक्तीच्या मोबाईलवरून गावात फोन करून घडलेल्या घटनेची माहिती दिली. संकेत तो पर्यंत रक्ताच्या थारोळ्यात पडला होता.

शिरोली पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक पंकज गिरी व त्यांचा स्टाफ तत्काळ घटनास्थळी दाखल झाला. जखमी संकेत खामकर याला तत्काळ कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपचारा दरम्यान संकेत खामकर याचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जाहीर केले. धारदार शस्त्राने संकेतच्या छातीत खोलवर वार झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. घटनेची नोंद रात्री उशिरा पर्यंत सुरू होती.

कास पठारावर फुले उमलण्यापूर्वीच समितीच्या दादागिरीने पर्यटक हतबल

सातारा दि: जागतिक पर्यटन स्थळ म्हणून सातारचे कास पठार नावा रूपाला आल्यानंतर याकडे पर्यटक आकर्षित झालेले आहेत. अद्यापही फुलं उमलण्यास अवधी असतानाच हिरवी जाळी पसरवण्याचे काम सुरू आहे. प्रत्यक्ष या ठिकाणी कास पठार समितीच्या काही लोकांकडून पर्यटकांकडून चिरीमिरी वसूल करून त्यांना दंडात्मक कारवाईची भीती दाखवली जात असल्याची बाब उघडकीस आलेली आहे. यामुळे काही पर्यटक हतबल झाले असून ही समिती बरखास्त न केल्यास याबाबत न्यायालयात याचिका दाखल करू असा सज्जड दम पर्यटन प्रेमी लोकांनी दिलेला आहे.

कासचे पठारावर अनेक दुर्मीळ प्रजाती आहेत. या ठिकाणी स्थानिकांना चांगला रोजगारही मिळालेला आहे .त्याचे सर्वांनी मनापासून कौतुक केले आहे. दोन वर्षांपूर्वी कोणतेही सूक्ष्म संशोधन न करता कास पठारावर लोखंडी जाळी मारल्यामुळे फुलांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाली. आता पूर्वीसारखी फुले येत नाहीत. एवढेच नव्हे तर जागतिक पर्यटन स्थळ असा नावलौकिक असलेल्या कास पठारावर अनेकजण खुलेआम पार्ट्या करून ''''''काच ''''''पठार करून टाकलेले आहे. याबाबत सायकलिंग करणाऱ्या अनेक युवकांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्याकडे लक्ष देण्यासाठी समितीच्या कोणालाही वेळ नाही.

शासकीय वरिष्ठ अधिकारी, वन विभाग यांच्याशी हितगुज व अर्थपूर्ण संबंध ठेवून काहीजण समितीमध्ये घुसलेले आहेत. त्यामुळे स्थानिक गरीब व कष्टकरी भूमिपुत्रांना त्याचा कोणताही लाभ मिळत नाही. ही बाब सुद्धा आता खटकू लागलेली आहे

कास पठार आज भारतात महाराष्ट्र राज्यातील सातारा जिल्ह्यात असून एक लाख ४० हजार चौरस किलोमीटर क्षेत्रफळ व्यापणाऱ्या पश्चिम घाटातील एक प्रसिद्ध, जैवविविधता असणारे ठिकाण आहे.

युनेस्कोने २०१२ मध्ये, सेंट पीटर्सबर्ग, रशिया येथे आयोजित जागतिक वारसा समितीने अभ्यासपूर्ण व प्रत्यक्ष कास पठारला भेट देणाऱ्या शास्त्रज्ञ व संशोधन च्या माध्यमातून कास पठाराची जागतिक नैसर्गिक वारसा स्थळ म्हणून घोषणा केली आहे. दरवर्षी पावसाळ्याला सुरुवात होताच या ठिकाणी दुर्मिळ असे फुल उमलतात. सुरुवात होत आहे. या कास पठारच्या लोकप्रियतेमुळे आता सातारा जिल्ह्यात अनेक ठिकाणी अशा पुष्प पठाराची माहिती वृत्तपत्रातून व सोशल मीडियातून दिली जात आहे परंतु खरं सौंदर्य हे कास पठारावरच पाहण्यास मिळते. सध्या कास पठारावरील जनावरांची संख्याही कमी कमी होऊ लागल्यामुळे तसेच अनेकांनी स्थलांतर केल्यामुळे कास पठारचे सौंदर्य धोक्यात आलेले आहे.

कास पठाराच्या आजूबाजूच्या जंगलात आढळणाऱ्या कास वृक्ष येथे आहे. तसेच कास पठारावर ८५० हून अधिक प्रकारच्या फुलांच्या प्रजाती आढळतात, त्यापैकी ६२४ ह्या रेड डेटा बुक-२ मध्ये सूचीबद्ध आहेत. आणि त्यापैकी ३९ प्रजाती ह्या फक्त कास कास पठारावर आढळतात. गेल्या वर्षापासून

ऑनलाइन बुकिंगच्या सुविधेमुळे परदेशी व परराज्य पर जिल्ह्यातून येणारे पर्यटकांना मुक्तपणाने संचार करण्यास वेळ मिळत आहे. कास पठार कार्यकारी समितीच्या वतीने या ठिकाणी पेट्रोलिंग व रेस्क्यू ऑपरेशन केले जाते. परंतु सध्या फुल उमलली नाही तोपर्यंतच काही पर्यटकांना दंडात्मक कारवाईची भीती दाखवून चिरीमिरी घेतली जात आहे. एवढेच नव्हे तर या परिसरात शूटिंग करणे. फोटो काढणे व प्रत्यक्षात फुल ज्या ठिकाणी उमलतात. त्या ठिकाणी जाण्यास बंदी आहे. पण,,,,,,,,,,,,,,,,,,,, हात ओला केला की, मैतर भला होतो,,,,,,, याची चुणूक पाहण्यास मिळाली आहे.

याबाबत सातारा जिल्हा प्रशासन वन विभाग व सातारा जिल्हाधिकारी यांनी तातडीने बैठक घेऊन उपाययोजना करावी. अन्यथा कास पठार कार्यकारी समिती बरखास्त करण्यासाठी न्यायालयात धाव घ्यावी लागेल. असाही इशारा देण्यात आलेला आहे. दरम्यान, ऑनलाईन बुकिंग केलेल्या पर्यटकांनीही १५ ऑगस्ट नंतर व ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्या पर्यंतच ऑनलाइन बुकिंग करावी त्यानंतर त्यांची फसवणूक झाल्यास त्यांना ते स्वतः जबाबदार राहतील. कारण यावेळी कास पठारावर फुले नसतात. असे काही स्थानिकांनी सांगितले.

संजीवन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन मध्ये शासनाने विविध कोर्सेसना मान्यता

राजदंड न्युज नेटवर्क

पन्हाळा : पन्हाळा येथील संजीवन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन मध्ये चालु शैक्षणिक वर्षा पासून नियमित बी.बी.ए., एम.बी.ए. आणि बॅचलर ऑफ डिझाईन या तीन नवीन विद्याशाखा तसेच अर्टीफिशेल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंग (ए.आय.एम.एल.) हा पदवी कोर्स या अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून मंजुरी मिळाली असून चालु वर्षी पासुन अभ्यासक्रम सुरु होत असलेची माहिती संजीवन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशनचे चेअरमन पी. आर. भोसले यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

बी.बी.ए., एम.बी.ए. आणि बॅचलर ऑफ डिझाईन या तीन नवीन विद्याशाखा शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेशी सलग्न असणार असून बी.बी.ए. ची प्रवेश क्षमता ६० तर एम.बी.ए. ची १२० विद्यार्थी इतकी असणार आहेत. बॅचलर ऑफ डिझाईन या कोर्सची प्रवेश क्षमता ३० विद्यार्थी इतकी आहे. अर्टीफिशेल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंग हा पदवी कोर्स डीबाटु, लोणेरे यांचेशी सलग्न असणार असून त्याची विद्यार्थी प्रवेश क्षमता ३० इतकी आहे.

गतवर्षी शैक्षणिक वर्षापासून चालू झालेल्या अप्लाईड आर्ट या कोर्सची प्रवेश क्षमता ३० विद्यार्थी इतकी आहे. तर इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्पुटर इंजिनिअरींग ह्या पदवी कोर्सची प्रवेश क्षमता देखील ३० विद्यार्थी इतकी आहे. एम.एस.बी.टी. कडून पदविका विभागातील कॉम्पुटर सायन्स आणि इंजिनीअरींग कोर्सला वाढीव तुकडीची मान्यता मिळाली आहे त्याची विद्यार्थी क्षमता १२० इतकी झाली आहे. सर्व कोर्स येथील संजीवन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन मध्ये सुरु झालेने कोल्हापूर जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता येणार आहे.

नवीन शैक्षणिक धोरणा नुसार संजीवनची वाटचाल सुरु असून विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे संजीवन हे अभिमत विद्यापीठ म्हणून लवकरच नावारूपास येईल असेही पी. आर. भोसले यावेळी म्हणाले. पत्रकार परिषदेसाठी संजीवन ग्रुप ऑफ स्कूलचे सहसचिव एन. आर. भोसले, प्राचार्य डॉ. संजीव जैन, उपप्राचार्य डॉ. सुहास सपाटे, डीन अकॅडेमिक प्रा. एकनाथ साळोखे, सर्व विद्याशाखांचे विभागप्रमुख, अधीक्षक दिपक पाटील, लेखापाल कृष्णात शिंदे, प्रसिद्धी प्रमुख संग्राम पाटील उपस्थित होते.

किसन वीर कारखान्याचे संचालकांवर सीबीआयचा गुन्हा दाखल

(बँक ऑफ इंडियाची ६१ कोटी १५ लाख रुपयांची फसवणूक)

वाई : किसन वीर सातारा सहकारी साखर कारखाना व्यवस्थापनाने कर्ज मिळवण्यासाठी खोटी कागदपत्रे व माहिती देऊन बँक ऑफ इंडियाची ६१ कोटी १५ लाख रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार बँकेने कारखान्याचे तत्कालीन अध्यक्ष मदन भोसले, उपाध्यक्ष चंद्रकांत बजरंग इंगवले, कार्यकारी संचालक अशोक भार्गव जाधव व इतर यांच्या विरोधात सीबीआयकडे केली आहे. यानुसार पोलिसात गुन्हा दाखल झाल्याने एकच खळबळ उडाली आहे.

किसन वीर सातारा सहकारी साखर कारखान्यास विस्तारीकरण करण्यासाठी बँक ऑफ इंडियाने पन्नास कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केले. २०१० सालापासून कारखान्याचे आणि बँकेचे चांगले व्यवहारिक संबंध होते. त्यामुळे बँकेने एवढी मोठी रक्कम कर्ज स्वरूपात कारखान्याला मंजूर केली. ही रक्कम सिंधुदुर्ग जिल्हा सहकारी बँकेच्या करंट खात्यावर वळविण्यात आली. यावेळी बँकेने एक कोटी ७० लाख ४३१ रुपये ३८ पैसे व्याज खात्यामध्ये जमा करून घेऊन ही रक्कम कारखान्याला दिली होती. त्यानंतर ही रक्कम कारखान्याकडून थकीत झाली. दरम्यान कारखान्याने डोंबिवली नागरी सहकारी बँकेकडून कारखान्याच्या डिस्टिलरी उभारणीसाठी 'बँक ऑफ इंडिया' ला दिलेली मालमत्ता तारण देऊन बँकेची फसवणूक केली. कर्ज मिळवण्यासाठी बँकेकडे खोटी आर्थिक विवरणपत्रे व कागदपत्रे सादर केली व बँकेच्या सुविधांचा गैरविनियोग केला,असे तक्रारीत म्हटले आहे. सदरचे कर्ज प्रकरण थकबाकीत गेल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करताना बँक ऑफ इंडियाच्या व्यवस्थापनाला आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यामुळे बँक ऑफ इंडियाचे पुणे विभागीय व्यवस्थापक (वसुली) अनिल कुमार श्रीवास्तव यांनी १५ फेब्रुवारी २०२४ रोजी सी.बी.आय (नवी दिल्ली) यांच्याकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर २४ मे २०२४ रोजी पुणे येथील पोलीस आयुक्तालयात सदर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आर्थिक गुन्हे शाखा पोलीस उपायुक्त (नवी दिल्ली) मनीष हिरालाल नवलाखे अधिक तपास करत आहेत.

चाऱ्यासाठी अनुदान शंभरावर पिकांचा समावेश, शासन देणार निधी

पिंपरी चिंचवड : परिस्थितीत चारा टंचाईवर उपाय म्हणून गायरान व वैयक्तिक जमिनीवर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत चारा पिकांची लागवड करण्यासाठी शासनाने नुकतीच मान्यता दिली आहे. यामध्ये १०० चारा पिकांचा जवळपास समावेश करण्यात आला आहे. यामध्ये कृषी वन सामाजिक वनीकरण पशुसंवर्धनसह आदी विभागांचा सहभाग राहणार असल्याचे शासन आदेशात सांगण्यात आले आहे.

राज्यामध्ये आगामी काळात संभाव्य दुष्काळ परिस्थिती उद्भवली तर जनावरांना चाऱ्याचा तुटवडा पडू नये म्हणून एक शासन निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार चारा टंचाईवर उपाययोजना म्हणून गायरान व वैयक्तिक जमिनीवर चारा पिकांची लागवड करण्याचे शासनाने ठरवले आहे. राज्यातील नऊ कृषी हवामान विभाग विविध जमिनीचे प्रकार आणि सरासरी पर्जन्यमान याचा विचार करून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत चारा पिकांची लागवड करावी असे आदेशित करण्यात आले आहे.

गायरान, खासगी जमिनींवर लागवडीस मान्यता

या योजनेच्या अंतर्गत कामाचा मोबदला दर २९७ रुपये प्रतिदिन निश्चित करण्यात आला असून केंद्र शासनाने चारा लागवड करण्यासाठी काही मार्गदर्शक सूचना देखील केल्या आहेत. यामध्ये १०० च्यावर गवताचा व चाऱ्याचा फायदा होईल अशी झाडांची लागवड करण्याची सूचना केली आहे.

पाटण तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांना ४ जी पॉज मशीनचे वाटप

पाटण - पाटण तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदार यांना नवीन फोरजी पॉज मशिनचे वाटप करण्यात आले. दुर्गम, डोंगराळ भागात नेट अभावी कार्ड धारकांना धान्य घेताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता, वारंवार रेशन दुकानात हेलपाटे मारावे लागत होते, दुकानदार -कार्ड धारकांच्यात वादावादी होत होती, परिणामी जनतेला धान्यापासून वंचित रहावे लागत होते याची दखल घेत शिधापत्रिका धारकांना त्वरित धान्य मिळावे यासाठी शासनामार्फत सदर नवीन पॉज मशिन उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या फोरजी मशिनमुळे धान्य वितरण प्रक्रिया सुलभ होणार आहे, उपविभागीय अधिकारी मा. सुनील गाढे,जिल्हा पुरवठा अधिकारी वैशाली राजमाने , तसेच पाटण तहसीलदार अनंत गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली व पाटण पुरवठा शाखेचे प्रफुल्ल जाधव, कोळेकर व इतर अधिकारी व सर्व सहकारी यांच्या नियोजनातून पाटण तालुक्यातील सर्व दुकानदारांना नवीन पॉज मशीनचे वाटप करण्यात आले. यावेळी पाटण तालुक्यातील दुकानदार मोठ्या संख्येने उपस्थिती होते. हे नवीन मशीन कसे वापरावे याचा डेमो व संपूर्ण सविस्तर माहिती सर्व दुकानदारांना देण्यात यावेळी देण्यात आली.

मसूरच्या ब्रिटिशकालीन रेल्वे स्थानकाला नवा लूक

आरक्षित तिकिट गृहाची मागणी.... भुयारी मार्ग. पादचारी पूलाचे काम धिम्यागतीने

मसूर : मसूरच्या ब्रिटिश कालीन रेल्वे स्थानकाचा लूक बदलला आहे. जुन्या ब्रिटिशकालीन रेल्वे स्थानकाची इमारत जैसे थे ठेवण्यात आली आहे. अजूनही दगडी व भक्कम रेल्वे स्थानकाचे बांधकाम डोळ्यात भरते आहे. या इमारतीच्या बाजूलाच सर्व सोयीनयुक्त प्रशस्त व अद्यावत नवीन स्थानकाची उभारणी करण्यात आली आहे. प्लॅटफॉर्मही लांब व अद्ययावत स्वरूपात बांधण्यात आला आहे... एकंदरीत रेल्वे स्थानकाचा बुक बदलला आहे.

इंग्रज राजवटीतील ब्रिटिश कालीन संबोधले जाणारे रेल्वे स्थानक कराड तालुक्यातील मसूरला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रवाशांना या रेल्वे स्थानकाने मोठा दिलासा दिला आहे. नुकतेच या रेल्वे स्थानकाचे नूतनीकरण करण्यात आले आहे. यामध्ये नव्याने प्रवासी निवारण इमारतीची निर्मिती करण्याबरोबरच दुहेरी रेल्वे ट्रॅक, पश्चिम बाजूला नवा फलाट उभारण्यात आला आहे. मुंबई, पुणे, नागपूर,भुसावळ यासह अन्य राज्यांत जाण्यासाठी रेल्वे गाड्या थांबत असल्याने प्रवाशांचा रोजचा राबता आहे.

दुहेरी रेल्वे ट्रॅकच्या कामासह अन्य कामे युद्ध पातळीवर सुरू आहेत. दुहेरी रेल्वे ट्रॅकमुळे एकावेळी दोन गाड्या एकमेकाला पास होण्याबरोबर रेल्वे स्थानकात गाड्याही थांबणार आहेत. रेल्वे क्रॉसिंग मुळे एक गाडी स्थानकातच थांबवावी लागत होती. ती अडचण आता दूर होणार आहे. त्यात प्रवाशांची होणारी गैरसोय व वेळेची बचत होणार आहे. ही समाधानाची बाब आहे. कोयना एक्स्प्रेस दोन, महाराष्ट्र एक्सप्रेस दोन, सातारा -पंढरपूर- दादर, सह्याद्री एक्स्प्रेस,यासह पॅसेंजर चार गाड्या व अन्य दोन अशा बारा रेल्वे गाड्या थांबत असून प्रवाशांची चांगली सोय होत आहे. असे असले तरी राज्य मार्गावरून रेल्वे स्थानकाकडे येणाऱ्या रस्त्याची सुरू असलेल्या कामामुळे दुरावस्था झाली आहे. रात्रीच्या वेळी राज्य मार्गावर व रेल्वे स्थानकाला जाण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो आहे.

रेल्वे स्थानकावर चित्रपटाचे चित्रीकरण

स्वातंत्र्यपूर्व काळापासून मसूरचे रेल्वे स्थानक जुन्या दगडी भक्कम बांधकामात भक्कमपणे अजूनही उभे आहे. स्थानकाचे प्रवेशद्वार रेखीव अर्धगोलाकार असल्याने मोहक दिसते. अनेक हिंदी व मराठी चित्रपटाचे चित्रीकरण या स्थानकावर झाले आहे. नवीन स्थानकाची उभारणी करण्यात आली असली तरी जुनी इमारत जैसे थे ठेवण्यात यावी अशी अनेकांची अपेक्षा आहे.

आरक्षित तिकीटगृह आवश्यक

अत्याधुनिक यंत्रणेचा वापर करून मॉडीफॉय होत असलेल्या रेल्वे स्थानकाला आरक्षित तिकिट गृह सुरू करणे गरजेचे आहे. अशी मागणी होऊ लागली आहे. सध्य परिस्थितीत तिकिट आरक्षित रिझर्वेशन करण्यासाठी सातारा, कराडला हेलपाटे मारावे लागत असल्याने परिसरातील गावातील प्रवाशांचा वेळ, आर्थिक नुकसानीचा फटका बसत आहे. मसूर, उंब्रज, पाटण भागातला प्रवासीवर्ग या रेल्वे मार्गावर अवलंबून असतो.

पादचारीपूल...भुयरी मार्गाचे काम धिम्यागतीने

रेल्वेस्थानकावर एका फलाट वरून दुसऱ्या फलाटवर जाण्यासाठी बांधण्यात येणाऱ्या पादचारी पूलामुळे प्रवाशांना सोयीस्कर ठरणार आहे. यामुळे अपघातजन्य परिस्थिती उद्भवणार नाही. मात्र पुलाचे काम धिम्या गतीने सुरू आहे. रेल्वे स्थानका पासून काही अंतरावर कवठे, कोणेगावला जाण्यासाठी रेल्वे मार्गाखालून भुयारी मार्ग बांधला जात आहे. हे कामही अगदीच धिम्यागतीने सुरू आहे. सद्यस्थितीत लोकांना लांब अंतरावरून वळसा घालत जावे लागत आहे.